E ISSN: 2455-1511

# Sanskruti International Multidisciplinary Research Journal

INDEXED, PEER-REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

Volume IX Issue III Jan-Feb-Mar 2024

URL:www.simrj.org.in Journal UOI:1.01/simrj

IFSIJ IMPACT FACTOR: 6.225



Editor-in-Chief
SANTOSH BONGALE

Scanned with OKEN Scanner

**SANSKRUTI INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL**

***Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj***

***IFSIJ Impact Factor : 6.225***

# ना. धों. महानोर यांच्या कवितेतील निसर्ग आविष्कार

**प्रा. एस. एस. बोंगाळे**

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड जिल्हा- सातारा महाराष्ट्र

भ्रमणध्वनी: ९९२३९००८४० ईमेल : ssbcck@gmail.com

***सारांश :***

*साहित्यामध्ये मानवी भाव भावनांचे प्रतिबिंब उमटलेले असते. साहित्यिक समाज जीवनातून अनुभव एकत्र करतो आणि आपल्या प्रतिभेने त्याला एक नवीन आयाम प्रदान करतो. तेव्हा सर्जनशील साहित्याची निर्मिती होत असते. मानव आणि समाज यांचा परस्परसबंध घनिष्ट असून समाजजीवनातील घटना, प्रसंग, भोवताल, निसर्ग यांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. मानव आपल्या जाणीवेच्या क्षमतेवर नानाविध अनुभव घेत असतो. या अनुभवातून साहित्य निर्मिती होत असते. ना. धो. महानोर यांच्या काव्यातून मानवी भावभावनांचे स्वच्छ चित्र पाहायला मिळते. स्त्री सौंदर्याची काव्यात्मक गोडी अनुभवायला मिळते. आपल्या आसपासच्या विश्वामधूनच कवितांचे विषय मिळत असतात हे महानोरांच्या कविता शिकवून जातात. साधेपण आणि प्रासंगिकता यातून आलेला गोडवा त्यांच्या कवितेमध्ये प्रकर्षाने जाणवतो.*

*ना. धो. महानोर यांनी कवितेत निसर्ग आणला. त्यांची कविता रोमॅंटिक होती, पण तिची जातकुळी वेगळी होती. रूढ अर्थाने रोमॅंटिकपणाच्या सगळ्या कक्षा ओलांडून तिने वेगळी उंची गाठलेली आहे. त्यांची शब्दकळा विलक्षण चित्रदर्शी असल्यामुळे निसर्ग हा त्यांच्या जगण्याचा उद्गार झाला आहे. त्यांच्या कवितेत निसर्ग हा केवळ वर्णनविषय नाही नव्हता, तर त्यांनी शेतकऱ्याचं जगणं, त्याची सुख-दु:खं, दुष्काळ, दारुण अवस्था असं सगळं शेतकरी भावजीवन आपल्या कवितेत मांडलेले दिसते. एक कवी म्हणून ते थोर तर आहेतच म्हणून त्यांना रान कवी असे म्हटले जाते. प्रस्तुत शोधनिबंधात धों. महानोर यांच्या कवितेतील निसर्ग आविष्कार काय आहे, याविषयीचे चिंतन मांडलेले आहे.*

***बीजशब्द : कृषीसंस्कृती, निसर्ग, मानव आणि निसर्ग, काव्यसौंदर्य, स्त्री रूपे, निसर्ग आविष्कार***

**प्रस्तावना**:

मराठी काव्यप्रांतातील एक हिरवेगार चैतन्य म्हणजे कवी ना. धों. महानोर होत. त्यांची कविता अनुभवांमधून उगम पावते आणि निसर्गाचे मनोहारी चित्र वाचकांसमोर ठेवते. ना. धो. महानोर हे अत्यंत कृतिशील थोर साहित्यिक कवी होते. त्यांच्या कवितेत कायमच एक प्रकारचा सहजपणा व ताजेपणा जाणवत राहतो. रोजच्या बोलण्यातले शब्दच त्यांच्या कवितेमध्ये आढळतात. त्यांच्या 'या नभाने या भुईला दान द्यावे' या कवितेला पाठ्यपुस्तकामध्ये



Scanned with OKEN Scanner

मानाचे स्थान होते. सहजगम्य कविता असल्यामुळे त्यांचे साहित्य समजायला आणि अनुभवायला सोपे आहे. आपण कुठल्याही प्रसंगामध्ये असलो तरी त्यांच्या कवितांचे पुस्तक उघडून आस्वाद घेता येतो. सहजसोपे शब्द आणि त्यामध्ये दडलेला मथितार्थ ही त्यांची खासियत आहे. त्यांच्याविषयी मराठी रसिकांच्या मनात आदर ओतप्रोत भरलेला आहे. ते जेव्हा 'शब्दगंधे तू मला बाहूंमध्ये घ्यावे' असे लिहितात, तेव्हा खरोखरच त्यांनी तो गंध अनुभवलेला असतो हे लेखनातून आपल्याला जाणवत राहते. त्यांच्या साहित्याबद्दलचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते अत्यंत कृतिशील साहित्यिक होते. मराठी साहित्याला बालकवी, बहिणाबाई, महानोर या कवींची मार्मिक परंपरा लाभली आहे. त्यामधील बालकवींची भाषा प्रमाण भाषेच्या जवळ जाणारी, संस्कृतप्रचूर आहे. पण महानोरांच्या कवितेत कायमच एक प्रकारचा सहजपणा जाणवतो. आपल्या रोजच्या बोलण्यातले शब्दच त्यांच्या कवितेमध्ये आढळतात. सहज आणि उत्स्फूर्त कविता असल्यामुळे त्यांचे साहित्य समजायला आणि अनुभवायला सोपे आहे.

**ना. धों महानोर यांच्या कवितेतील निसर्ग आविष्कार**

अस्सल आणि अभिजात जे-जे, ते महानोरांजवळ आहे. ते म्हणजे लोकजीवन आणि लोकवाङ्मय यांचा व्यासंग आणि त्यातील अनुभव होय. त्यातूनच लय, गंध, शब्द, शैली, रस, रूप त्यांच्या एकंदर कवितेत काठोकाठ भरून राहिले. अल्पाक्षर रमणीयत्व हा त्यांच्या कवितेचा विशेष आहे. कवितेतील आशय मनात मुरत राहतो. कविता मन गुंतवून टाकते. लोकसंगीताचे त्यांचे ज्ञान प्रचंड होते. स्वर, ताल, लय, नाद, शब्द यांचा मोठा त्यांचा विशेष व्यासंग होता. महानोरांच्या कवितांवर गीताचे संस्कार झाल्यावरही मूळ सौंदर्य अबाधित राहिलेले आहे. 'श्रावणाचं ऊन मला झेपं ना', 'राजसा जवळी जरा बसा', अशा त्यांच्या लावण्या प्रचंड गाजल्या. 'दोघी', 'अजिंठा' जैत रे जैत या चित्रपटांमधील गाणी अजूनही रसिकांच्या ओठांवर आहेत. 'पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा', 'आम्ही ठाकरं ठाकरं', 'मी रात टाकली', 'घन ओथंबून येती' या गीतांनी मराठी चित्रपटसृष्टी गाजवली आहे. महानोरांच्या अनेक कवितांची गीतांमध्ये रूपांतरे झाली. तरीही कविता म्हणून वाचताना ही गीते आणखी भावतात. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या कवितेमधील सहजता हा गुण होय.

या नभाने या भुईला दान द्यावे,
आणि या मातीतून चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला,
जोंधळ्याला चांदणे लगडून जावे...

प्रस्तुत कवितेतील शब्दमाधुर्य मनाला अतिशय भावते. यातील सोपे आणि छंदबद्ध शब्द कौशल्य विशेष महत्त्वाचे वाटते. साधेपण आणि प्रासंगिकता यातून आलेला गोडवा त्यांच्या कवितेमध्ये प्रकर्षाने जाणवतो. महानोर यांच्या कवितेतील पर्यावरणाचे वर्णन मनात घर करून बसते. निसर्गाचे जे रूप प्रत्यक्ष बघायला मिळते ते त्यांच्या कवितेतूनचं. उतरलेल्या नभांमधून बरसणारा पाऊस 'नभ उतरू आलं…' प्रमाणे बरसू लागतो. आपणास थरथरणाऱ्या अंगाची अनुभूती घेता येते. निसर्ग हा माणसापेक्षा जास्त जिव्हाळा दाखवू शकतो हे महानोरांच्या कवितेतून जाणवते.



Scanned with OKEN Scanner

कळीत साकळलेले केशर, फुलांमध्ये न्हालेली ओली पहाट, कठीण झालेली पहिलटकरीण या साध्या-सोप्या शब्दांचे गहन अर्थासाठी प्रतिमेमध्ये कसे रूपांतर होते हे त्यांच्या कवितेतून लक्षात येते.

**ना. धो. महानोर यांचे साहित्य लेखन**

'रानातल्या कविता' या त्यांच्या पहिल्याच कवितासंग्रहाने मराठी कवितेत महत्त्वाचे स्थान निर्माण केले. गंगा वाहू दे निर्मळ, जगाला प्रेम अर्पावे, दिवे लागणीची वेळ, पावसाळी कविता, रानातल्या कविता हे त्यांचे काही प्रसिद्ध कवितासंग्रह. त्यांचे ११ कवितासंग्रह आणि 'अजिंठा' हे खंडकाव्य प्रकाशित आहे. 'वही' आणि 'पळसखेडची गाणी' हे त्यांच्या लोकगीतांचे संग्रह आहेत. महानोरांनी कवितेबरोबरच गद्य लेखनही भरपूर केले. 'गांधारी' ही कादंबरी, 'गपसप' आणि 'गावाकडच्या गोष्टी' हे लोककथांचे संग्रह, 'ऐशी कळवळ्याची जाती' हा व्यक्तिचित्रणात्मक ललित लेखांचा संग्रह असे विविधांगी ललित लेखन महानोरांनी केले आहे. याशिवाय 'यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार', 'शरद पवार आणि मी' तसेच 'आनंदयोगी पु. ल.' या पुस्तकांमधून त्यांनी महाराष्ट्रातील मोठी व्यक्तिमत्त्वे उलगडण्याचा प्रयत्न केला. अर्थात, महानोरांचे पहिले प्रेम कवितेवरच आहे. महानोर यांनी चित्रपटांसाठी उत्तमोत्तम गाणी लिहिली. 'जैत रे जैत' या चित्रपटात त्यांच्या कविताच गाण्यांच्या रूपाने आविष्कृत झाल्या आहेत. बऱ्याच लोकांना रानकवी, निसर्गकवी अशी त्यांची ओळख आहे; परंतु त्यांनी ठसकेबाज लावण्याही लिहिल्या आहेत. श्रावणातील उन्हाचा कोवळेपणा आणि स्त्रीच्या नाजूकपणाचा साज एकत्रितपणे चितारणारी 'श्रावणाचे ऊन मला झेपेना' ही त्यांची लोकप्रिय झालेली ठसकेबाज लावणी. 'एक होता विदूषक' या चित्रपटासाठी आशा भोसले यांनी ही लावणी गायली. 'चिंब पावसानं रान झालं आबादानी, नभ उतरू आलं, जांभूळ पिकल्या झाडाखाली, किती जीवाला राखायचं राखलं अशी एकाहून एक सरस गाणी ना. धों. महानोर यांनी लिहिली. त्यापैकी 'अजिंठा' या दीर्घ काव्यसंग्रहाचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. गपसप, गावातल्या गोष्टी हे त्यांचे कथासंग्रहही आहेत. त्यांनी आपल्या साहित्यात बोलीभाषांचा वापर केला. पानझड, तिची कहाणी, पळसखेडची गाणी ही महानोरांनी लिहिलेली गाणी मराठवाडी लोकगीतांचा खजिनाच आहेत.

**महानोरांच्या कवितेतील निसर्ग आणि स्त्री रूपे**

निसर्ग आणि स्त्री ही महानोरांच्या कवितेची केंद्रस्थाने आहेत. त्यांच्या कवितेत निसर्गाचे विविध गंध आढळतात, विविध ध्वनी आढळतात, निसर्गाच्या स्पर्शाने फुललेला आणि रोमांचित करणारा शृंगार त्यात झळकतो. या कवितेत मातीशी जडलेली नाती आहेत. त्यांनी कवितेत निसर्ग आणला. त्यांची कविता रोमँटिक होती, पण तिची जातकुळी वेगळी होती. रूढ अर्थाने रोमँटिकपणाच्या सगळ्या कक्षा ओलांडून तिने वेगळी उंची गाठलेली होती. त्यांची शब्दकळा विलक्षण चित्रदर्शी होती. निसर्ग हा त्यांच्या जगण्याचा उद्गार होता. त्यांच्या कवितेत निसर्ग हा केवळ वर्णनविषय नव्हता, तर त्यांनी शेतकऱ्याचं जगणं, त्याची सुख-दुःखं, दुष्काळ, दारुण अवस्था असं सगळं शेतकरी भावजीवन आपल्या कवितेत आणलं. एक कवी म्हणून ते थोर होते. त्यांना केवळ रानकवी किंवा निसर्गकवी या संबोधनांच्या मर्यादेत अडकवणं त्यांच्या प्रतिभेचा अनादर करण्यासारखं आहे. त्यांचं गद्य लिखाणही त्यांच्या कवितेसारखंच खणखणीत होतं.



Scanned with OKEN Scanner

गुंतलेले प्राण या रानात माझे,
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुन बेहोष होता,
शब्दगंधे तू मला बाहूत घ्यावे...

मराठी कवितेवर अविचल निष्ठा ठेवत; शेतीशी कायमपणे जोडून घेत, प्रीती आणि निसर्ग यांचे विश्व लेखनीतून अमर करणारे ना. धों. महानोर साठोत्तरी कालखंडातील जनमान्य कवी. त्यांनी शेतीविषयक लेखन केले. व्यक्तीचित्रे रेखाटली. मराठी गाणी आणि कविता या दोन क्षेत्रांत महानोरांचा दबदबा श्रेष्ठ राहिला. त्यांची कविता आणि गाणी जनामनांच्या ओठांवर कायम खिळून राहिली. मराठी कवितेत स्वतंत्र शब्दविश्व, खास प्रतिमांची भाषा आणि येथील लोकपरंपरेतील रूपकं यांचे खास असे दालनच या प्रतिभावंत ज्येष्ठ अशा कवीने उघडले. त्यांच्या कवितेची मनांत घर करणारी त्यांच्या कवितेची लय, निसर्गाचे संपूर्ण मनोहारी दर्शन घडवणारी शब्दकळा, माणसांच्या दु:खजाणिवांना भिडणारी खास शब्दकळा आणि कवितोला लगडून असणारा मातीचा अस्सल गंध याचबरोबर स्त्री रूपाचे सौंदर्य निसर्ग प्रतीमातून उलगडण्याची खासियत आदी वैशिष्ट्ये आहेत.

वस्तुतः अजिंठा सारखे रसरशीत दीर्घकाव्य किंवा अकादमीने सन्मानीत केलेली 'पानझड' मधली कविता किंवा ग्रामीण स्त्रीजीवनाचा श्रमपट थेट मांडणारी 'तिची कहाणी' मधली कविता किंवा 'प्रार्थना दयाघना' मधील शेतशिवार शेतकरी – श्रमकरी यांचा अवकाश स्वीकारणारी दीर्घकविता : हे सगळे त्यांचे लेखन अक्षर ठरलेले लेखन आहे. "रानातल्या कविता" हा त्यांचा संग्रहच्या संग्रह तोंडपाठ असणारी कितीतरी माणसं देशो- देशी भेटतात. याप्रमाणेच, महानोरांच्या गाण्यांचेही गारुड असेच उचित्रपटांच्या गाण्यांना प्रतिष्ठा आणि गुणवत्ता मिळवून देणारे महानोर हे कदाचित एवढे मोठे एकमेव कवी आहेत असे म्हटले तर वावगे ठरू नये.

मातीतला
गंध ओला
चौखूर दिशांना
पाखरांचे पंख, आम्हा
आभाळ पुरेना

चित्रमय शैलीत आसमंत व त्यातील विभ्रम रेखाटताना महानोर म्हणतात कि,

बगळयांच्या ढवळया माळा आभाळ गेल्या
तिच्या लालसर नखात मेंदी गोंदुन ओल्या
निळ्या नितळ डोळ्यांत सारखे नभ भरकटते
दूर नभाच्या पल्याड कुठले गाव नांदते

किंवा

जास्वंदीच्या फांदीवरले ऊन थरकते



Scanned with OKEN Scanner

थरकबिथरल्या पाण्यावरती तरंग होते
खडकावर चुकल्या बगळ्यापरि दुपार नुस्ती
उघड्यावरती शुभ्र मुलायम अंग घासते

ना. धो. महानोर यांचा काव्यात शब्दांचा वेध घेत जीवन सौंदर्यपूर्ण करण्याचा जुना हव्यास कायम राहिलेला आहे.

युगांचे वेध पायांना कधी संपू नये वाट
दिवे दूरात तेजाचे उरी आनंदले लोट
निळ्या स्वप्नात हसताना कुण्या हुलकीत बहरावे
असे शब्दांत गुरफटता नवे आकाश धुंडावे

निसर्गातील दृक्, रंग, नादयुक्त संवेदनांचे विश्व जागे करताना महानोर उद्गारतात.

राघू उठून जाताना फांदी हले झुले
पानांतल्या थेंबांपाशी नभ उतरले
नभ उतरले गर्द जांभळीचे झेले
झुलणाऱ्या फांदीपाशी पैंजण वाजले
गोरे भुरे पाय असे गाण्यात सांडले
झुलणाऱ्या झाडासाठी राघू पुन्हा आले.

संवेदनशील, तरल, सुकुमार आणि वेधक प्रतिमांची गुंफण प्रस्तुत कवितेत आढळते.

थेंब गळे ऊन
पानांतून चंद्रबन
निळ्या सावळ्या मेघांचे
आभाळगोंदण

ना. धो. महानोर यांच्या कवितांतील प्रतिमाविश्व निसर्गानुभूतीने ओथंबलेले आहे. त्यांच्या कवितेत निसर्ग जिवंत स्वरूपात आपणाला दिसतो. 'वही' या कवितासंग्रहात स्त्री पुरुष प्रणयानुभूतीचे चित्र रेखाटणाऱ्या अनेक उत्तम कविता आहेत. यादृष्टीने क्र. २०, २३, २४, २६, २७, २८, ३३, ३४, ३५, ३६, ४६, ४७ आणि ४८ मधील आशय अधोरेखित करता येईल. शारीर-चित्रणाबरोबर कवीने येथे शारीर-मानसभाव काव्यात्म ढंगाने व्यक्त केले आहेत.

उदा.

पाऊसपाणी
चिंब निथळुनी
अंग अंग भिजलेले
घट्ट चोळीच्या गाठी रुतल्या
रुतून राजसझेले



Scanned with OKEN Scanner

गाठ उकलिता

हळु सावरता

मस्त झुलत मनमानी

तिच्या मनाचा मोर नाचतो

नाचत नभ मेघांनी

लावणी मधील शृंगारानुभूती लावणीच्या ढंगाने व्यक्त झाली आहे.

राजसा

जवळि जरा बसा

जीव हा पिसा तुम्हाविण बाईऽ

कोणता करू शिणगार सांगा तरि काहीऽ

'पावसाळी कविता' या कवितासंग्रहात पर्जन्यानुभूतीविषयक जवळजवळ ५० कविता आहेत. मराठवाड्यासारख्या पावसाचा अभाव असणाऱ्या प्रदेशात राहूनही कवी ना. धों. महानोरांनी आनंदानुभवाबरोबर दुःखाच्या असोशीला उद्गार दिलेला आहे. उदा. पुढील काव्यपंक्तीतून आशयाची खोली लक्षात येते.

पीक करपले...

पक्षी दूरदेशी गेले

गळणाऱ्या झाडांसाठी

ना. धों. महानोर यांच्या कवितेतील अनुभूतीचे रंगविश्व अनोखे आहे; त्यात आशेचे प्रखर किरण आहेत. वाचकांच्या मनाला ते प्रकाशमान करतात.

मन चिंब पावसाळी, झाडांत रंग ओले

घनगर्द सावल्यांनी आकाश वाकलेले

पाऊस पाखरांच्या पंखांत थेंबथेंबी

शिडकाव संथ येता पाने निळी कुसुंबी

घरट्यात पंख मिटले झाडांत गर्द वारा

गात्रांत कापणारा ओला फिका पिसारा

मानवाच्या जीवनभर व्यापून राहिलेली सुख-दुःखाची छाया मानवी मनाला संत्रस्त करणारी आहे. या विश्वव्यापक दुःखाला, जीवघेण्या वास्तवाला कवीने वाचा फोडलेली आहे. ती पुढीलप्रमाणे

हे खेडे अंधाराचे

हे खेडे प्रकाशाचे

जन्मोजन्मी लक्तरलेले

दुःख घेऊन चालत आले.



Scanned with OKEN Scanner

**निष्कर्ष :**

१. महानोरांच्या कवितेत निसर्गाची विविध मनोहारी रूपे पहावयास मिळतात. त्यांच्या कवितेत कायमच एक प्रकारचा सहजपणा व ताजेपणा जाणवत राहतो.

२. महानोरांच्या कवितेतून जीवनभर व्यापून राहिलेली सुख-दुःखाची छाया मानवी मनाला संत्रस्त करणारी असली तरी या विश्वव्यापक दुःखाला, जीवघेण्या वास्तवाला कवीने वाचा फोडलेली आहे हे दिसून येते.

३. प्रणयानुभूतीचे चित्र रेखाटणाऱ्या अनेक कविता आहेत. शारीर-चित्रणाबरोबर कवीने येथे शारीर-मानसभाव काव्यात्म ढंगाने व्यक्त केले आहेत.

४. ना. धों महानोर यांच्या कवितेत स्वर, ताल, लय, नाद, शब्द यांचा संगम असून तो त्यांच्या कवितेचा मोठा विशेष म्हणता येईल.

५. त्यांच्या कवितेत निसर्ग हा केवळ वर्णनविषय नव्हता, तर त्यांनी शेतकऱ्याचं जगणं, त्याची सुख-दुःखं, दुष्काळ, दारुण अवस्था असं सगळं शेतकरी भावजीवन आपल्या कवितेत मांडलेले दिसते.

**संदर्भ :**

१. डॉ. सौ. रामकली पावसकर, 'मराठी कविता प्रवृत्ती आणि प्रवाह', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१५

२. गंगाधर गाडगीळ, 'खडक आणि पाणी', पाप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६०

३. अ.ना. देशपांडे, 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' –भाग २ व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९७०

४. डॉ. रा. गो. नाईकवाडे, 'ना.घ. देशपांडे आणि ना. धों. महानोर यांची कविता', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००३

५. विजया राजाध्यक्ष, 'परिशिष्ट, रानातल्या कविता, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९८४

६. ना. धो. महानोर ,'रानातल्या कविता,' पाप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९८४



Scanned with OKEN Scanner